# रत्नागिरी जिल्हा कोव्हीड अंतर्गत पदभरती सन २०२१-२०२२

## भरण्यात येणारी पदे-फिजिशिअन/ वैदयकिय अधिकारी, एमबीबीएस/ आयुष वै. अधिकारी व स्टाफ नर्स व प्रयोगशाळा तंत्रज्ञ

राष्ट्रीय आरोग्य अभियान, रत्नागिरी अधिनिस्त खालील नमुद करणेत आलेली मनुष्यबळ भरती कोवीड - 19 उपचारासाठी जिल्हयात कोरोनाचा कोवीड - 19 वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन उद्रेक सद्ध्य परिस्थिती हाताळण्यासाठी अधिकची आरोग्य सेवा देण्याकरिता DCH, DCHC, CCC येथे कोवीड - 19 साथीचा संसर्गजन्य आजार नियंत्रणात येईपर्यंत खालील प्रस्तावित पदांना तीन महिने या कालावधीसाठी नेमणूक देणेकरिता खालीलप्रमाणे थेट मुलाखतीचे आयोजन करणेत येत आहे.

जे उमेदवार सीसीसी/डिसीएच/डिसीएचसी चे (जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी व उपजिल्हा रुग्णालय) ठिकाणी काम करु इच्छित आहेत त्यांनी या कार्यालयाच्या ई मेल आयडी rtnzpcovid2021@gmail.com वर अर्ज सादर करावेत अधिक माहितीकरीता या कार्यालयाच्या मो नं 7666924276 वर संपर्क साधावा.

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार पुढील तीन महिने करिता मुदतवाढ देणेत येईल. आवश्यकतेनुसार कंत्राटी पदधतीने मानधन तत्वावर भरणेसाठी प्रतिक्षा यादी करणेकरिता अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | मुळ संवर्ग | एकुण भरावयाची पदे | शैक्षणिक अर्हता | मासिक मानधन | पदे कार्यरत करावयाची ठिकाणे |
|---|---|---|---|---|---|
| १ | फिजिशिअन | 6 | MD MEDICINE | रु.1,20,000/- | DCH/ DCHC |
| २ | भुलतज्ञ | 15 | MD ANESTHESIA DA/DNB | रु.1,20,000/- | DCH/ DCHC |
| ३ | मायक्रोबायोलॉजिस्ट | 2 | MD Microbiology | रु.75,000/- | DCH |
| ४ | वैदयकिय अधिकारी | 15 | MBBS | रु.90,000/- | DCH/ DCHC |
| ५ | आयुष वैदयकिय अधिकारी | 12 | BAMS/BUMS/BDS (Medical Council Registration) | रु.40,000/- | CCC/ DCH/ DCHC |
| ६ | स्टाफ नर्स | 100 | GNM/ BSC Nursing (Maharashtra Nursing Council Registration) | रु. 20,000/- | DCH/ DCHC/ CCC |
| ७ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | 16 | Bsc DMLT | रु.17,000/- | DCH/ DCHC/ CCC |

### अटी व शर्ती खालीलप्रमाणे-

१) मा. आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचे नियमितपणे प्राप्त होणा-या भरतीबाबतचे मार्गदर्शक सुचनांचा अवलंब करणेत येईल याची पात्र उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२) सदर सेवा निव्वळ कोवीड - 19 उपचारासाठी तसेच जिल्हयातील उद्रेक सद्ध्य परिस्थिती हाताळण्यासाठी अधिकचे आरोग्य सेवा देणा-या अधिकारी व कर्मचारी यांची आवश्यकता लक्षात घेऊन ठराविक कालावधीसाठी आहेत. भरावयाची पदे राज्य शासनाची नियमित पदे नाहीत. शासकीय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनाकडे सेवा संरक्षणासाठी दावा करणेचे कोणतेही अधिकार नियुक्त उमेदवारास राहणार नाहीत. तसेच कोणतीही पूर्वसुचना न देता सेवा समाप्त करण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांना राहील.

३) सार्वजनिक आरोग्य विभागातुन सेवानिवृत कर्मचारी विहित वयोमर्यादा व शैक्षणिक अर्हतेचा निकष पुर्ण करीत असतील तर अर्ज करु शकतील. तसेच आशा स्वयंसेविका यांचेमधून जीएनएम झालेले उमेदवार असतील तर त्यांना प्राधान्य देणेत येईल.

४) जीएनएम/ बीएससी (नर्सिंग) उमेदवार आवश्यकतेप्रमाणे उपलब्ध झाले नाहीत तरच ANM (आरोग्य सेविका) उमेदवारांचा विचार करणेत येईल. याची एएनएम उमेदवारांनी नोंद घेणेची आहे. (आरोग्य सेविकांसाठी एएनएम शैक्षणिक अर्हता उतीर्ण व एमएनसी कौन्सिलची मान्यता आवश्यक राहील. या पदासाठी मानधन रु. 18000/- (अक्षरी रु. अठरा हजार मात्र) राहिल.

५) फिजिशिअन, वैदयकिय अधिकारी -एमबीबीएस, आयुष वैदयकिय अधिकारी व स्टाफ नर्स या पदासाठी शैक्षणिक अर्हता पुर्ण करणा-या इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज व विहित शैक्षणिक अर्हताधारक प्रमाणपत्रके ई-मेल वर सादर करावयाची आहेत.

६) निवड झालेल्या उमेदवारांना राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कर्मचा-यांप्रमाणे राज्य आरोग्य सोसायटीकडून प्राप्त झालेल्या अटी व शर्थी रु. 100/- चे बॉन्डपेपरवर लिहून करारनामा सादर करणे बंधनकारक आहे.

Scanned with CamScanner

७) <u>वयोमर्यादा</u>- वैदयकिय अधिकारी, एमबीबीएस, स्पेशालिस्ट या पदांची भरतीसाठी कमाल वयोमर्यादा 61 वर्षे व सेवा समाप्तीची मर्यादा 70 वर्षे राहिल. स्टाफ नर्स, या पदांची भरतीसाठी कमाल वयोमर्यादा 59 वर्षे व सेवा समाप्तीची मर्यादा 65 वर्षे राहिल. 60 वर्षावरील अर्जादारांकरिता जिल्हा शल्य चिकित्सक प्रमाणित शारिरिक योग्यतेचे प्रमाणपत्रक (मेडिकल फिटनेस सर्टिफिकेट) सादर करणे अनिवार्य राहिल.

८) कोवीड 19 साठी पदांचे आवश्यकतेनुसार प्रतिक्षा यादीचे क्रमांकानुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश देय राहतील.

९) अर्जदार हा शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

१०) शासकीय कर्मचारी यांचेवर पुर्वीच्या शासकीय कर्मचारी कार्यकाळात कुठल्याही प्रकारची प्रशासकीय/ वित्तिय कार्यवाही, दंडात्मक कार्यवाही किंवा फौजदारी अथवा इतर कुठल्याही प्रकारचे गंभीर गुन्हयाची नोंद नसावी किंवा झालेली नसावी.

११) भरती प्रकियेतील सर्व अधिकार मा. जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेजवळ राखुन ठेवणेत आलेले आहेत.

सही

**जिल्हाधिकारी तथा**

**अध्यक्ष कोव्हीड-१९ निवड समिती**

**जिल्हा रत्नागिरी**

Scanned with CamScanner

NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA
NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

**कोवीड 19 उपचार व नियंत्रणासाठी नेमणेत येणारे मनुष्यबळासाठी विहित अर्जाचा नमुना**

मा. अध्यक्ष, निवड समिती
तथा जिल्हाधिकारी रत्नागिरी.

मी खालीलप्रमाणे माझी विहीत केलेल्या पदासाठी माहिती देत आहे.

1) पदाचे नाव- ______________________________

2) अर्जदाराचे संपुर्ण नाव (मराठी) - ______________________________

3) अर्जदाराचे संपुर्ण नाव (इंग्रजी) - ______________________________

4) कायमस्वरुपी निवासस्थानाचा पिनकोडसहीत संपुर्ण पत्ता- ______________________________

5) दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक- ______________________________

6) ई- मेल आयडी ______________________________

7) जन्मतारीख -    /    /    तसेच माहे 31/ 03/ 2021 अखेर पुर्ण वय- ——वर्षे व —— महिने

8) शैक्षणिक अर्हता-

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परिक्षा | विदयापीठ/ मंडळाचे नाव | अंतिम वर्षाचे एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

9) अनुभव

| अ.क्र. | शासकीय/निमशासकीय/ संस्थेचे नाव/ पत्ता व दुरध्वनी | कालावधी | | एकुण अनुभव कालावधी | |
|---|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | महिने | दिवस |
| | | | | | |
| | | | | | |

कृपया मागे पहावे

Scanned with CamScanner

9) उमेदवाराचे न्यायप्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगविषयक प्रकरण अगर त्यासारखी कारवाई चालु आहे काय असलेस त्याचा तपशील दयावा.

| होय | नाही |
|---|---|
| | |

10) अर्जासोबत खालीलप्रमाणे साक्षांकित सत्यप्रती जोडलेल्या आहेत

1) ______________________________

2) ______________________________

3) ______________________________

4) ______________________________

11) अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय ? आहे/ नाही

मी असे प्रमाणित करते/ करतो की उपरोक्त नमुद माहिती खरी आहे. सदरची माहिती खोटी अथवा प्रशासनाला दिशाभुल करणारी वाटलेस माझी नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करणेत येईल व माझेवर कायदेशीर कारवाई करणेत येईल याची मला जाणीव आहे.

सही/-

उमेदवाराचे पुर्ण नाव

---

कार्यालयीन कामकाजासाठी

अपात्र असलेचे कारण

1) ______________________ -2) ______________________

तपासणी अधिकारी यांचे पुर्ण नाव
हुद्दा व स्वाक्षरी

नियंत्रण अधिकारी यांचे पुर्ण नाव
हुद्दा व स्वाक्षरी

Scanned with CamScanner